लोकमत

# सौंदर्यप्रसाधन कंपनीत ६ विद्यार्थ्यांची निवड

## शिरपूर : आर.सी.पटेल बी.टेक कॉस्मेटिक कॉलेज

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** येथील आर.सी.पटेल फार्मसी महाविद्यालयातील बी.टेक कॉस्मेटिकच्या ६ विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय सौंदर्यप्रसाधन निर्मिती कंपनीमध्ये निवड करण्यात आली.

अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या ६ विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय सौंदर्यप्रसाधन निर्मिती कंपनीमध्ये निवड झाली. महाविद्यालयातील एकनाथ जाधव, रेशमा शेख, ललित सोनवणे, सत्यम महाजन, अक्षय



रेशमा शेख



एकनाथ जाधव

पाटील, हर्षल पाटील अश्या चार विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड झाली. सर्व विद्यार्थ्यांना २.४ लाखाचा पगार आहे.

अनेक कंपन्याच्या विक्री विभागासाठी कॉस्मेटिक्स तंत्रज्ञानातील पदवी आवश्यक आहे. नामांकित कॉस्मेटिक इंडस्ट्रीज नवीन कॉस्मेटिकच्या शोधात असतात म्हणून रिसर्च अँड डेव्हलपमेंट हे आव्हानात्मक क्षेत्र आहे लवकरच महाविद्यालयात पदव्युत्तर एम.टेक कॉस्मेटिक्स हा अभ्यासक्रम सुरू होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्राचार्य डॉ.संजय सुराणा, उपप्राचार्य डॉ.अतुल शिरखेडकर यांनी केले.

Hello Dhule
Page No. 2 Jul 05, 2018
Powered by: erelego.com